| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **MHBI140016332024** | दाखल दिनांक | : | २० / ०९ / | | २०२४ |
| | नोंदणी दिनांक | : | २० / ०९ / | | २०२४ |
| | निकाल दिनांक | : | १२ / ०५ / | | २०२६ |
| | कालावधी | : | व. | म. | दिवस |
| | | | ०१ | ०७ | २२ |

**भाग 'अ'**

## आष्टी येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, (न्यायालय क्र.३)
### ता.आष्टी, जि.बीड यांचे न्यायालयात
### (पिठासीन अधिकारी : महेश आर. बडाख)

(न्यायनिर्णय : दिनांक १२/०५/२०२६)

**नियमित फौजदारी खटला क्र.२४५/२०२४** **निशाणी क्र.६७/ब.**

प्रथम खबर अहवाल तपशील
गुन्हा नोंद क्र. : ५२७/२०२३
पोलीस ठाणे : आष्टी, ता.आष्टी, जि.बीड.

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत पोलीस ठाणे आष्टी,<br>ता.आष्टी, जि.बीड. |
| सरकारी अभियोक्ता | **श्री.व्ही.एस.गव्हाळे** |
| **आरोपी** | १. **बाळासाहेब आप्पा मदने,**<br>वय : ५० वर्षे, धंदा : शेती, |
| | २. **रुपाली बाळासाहेब मदने,**<br>वय : ३० वर्षे, धंदा : शेती, |
| | ३. **तुषार बाळासाहेब मदने,**<br>वय : १९ वर्षे, धंदा : शेती, |
| | ४. **आप्पा बाबु मदने,**<br>वय : ६५ वर्षे, धंदा : शेती, |

| | |
|---|---|
| | **५. सिंधुबाई आप्पा मदने,**<br>वय : ६० वर्षे, धंदा : शेती, |
| | **६. संजय आप्पा मदने,**<br>वय : ३६ वर्षे, धंदा : शेती,<br>सर्व रा.मदने वस्ती, शिराळ, ता.आष्टी, जि.बीड. |
| आरोपींचे विधीज्ञ | **श्री.ए.एस. निंबाळकर** |

**भाग 'ब'**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | ०३/१२/२०२३ |
| प्रथम खबर अहवाल | ०५/१२/२०२३ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | २०/०९/२०२३ |
| दोषारोप निश्चीती दिनांक | २०/०९/२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ३०/०८/२०२५ |
| निकाल राखुन ठेवल्याचा दिनांक | --- |
| न्यायनिर्णय दिनांक | १२/०५/२०२६ |
| शिक्षा सुनावल्याचा कालावधी लागु असल्यास | --- |

**आरोपींचा तपशील**

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामीनवर मुक्त झाल्याचा दिनांक | दोषारोपाचे कलम | आरोपीस शिक्षा किंवा निर्दोष मुक्त केले. | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ प्रमाणे कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बाळासाहेब आप्पा मदने | ४१ अ प्रमाणे नोटीस | ४१ अ प्रमाणे नोटीस | भा.दं.वि. चे कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्त केले. | -- | -- |
| २ | रुपाली बाळासाहेब मदने | ४१ अ प्रमाणे नोटीस | ४१ अ प्रमाणे नोटीस | भा.दं.वि. चे कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्त केले. | -- | -- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | तुषार बाळासाहेब मदने | ४१ अ प्रमाणे नोटीस | ४१ अ प्रमाणे नोटीस | भा.दं.वि. चे कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्त केले. | -- | -- |
| ४ | आप्पा बाबु मदने | ४१ अ प्रमाणे नोटीस | ४१ अ प्रमाणे नोटीस | भा.दं.वि. चे कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्त केले. | -- | -- |
| ५ | सिंधुबाई आप्पा मदने | ४१ अ प्रमाणे नोटीस | ४१ अ प्रमाणे नोटीस | भा.दं.वि. चे कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्त केले. | -- | -- |
| ६ | संजय आप्पा मदने | ४१ अ प्रमाणे नोटीस | ४१ अ प्रमाणे नोटीस | भा.दं.वि. चे कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्त केले. | -- | -- |

## भाग 'क'

## अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार

| अ.सा.क्र. | साक्षीदारांची नांवे | साक्षी प्रकार | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| १) | वंदना राजेंद्र मदने | फिर्यादी | ३७ |
| २) | राजेंद्र पन्हालाल मदने | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | ४५ |
| ३) | शांतीलाल सोनाजी मदने | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | ४६ |
| ४) | विलास सोनाजी मदने | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | ४९ |
| ५) | बबन धोंडीबा श्रीराम | घटनास्थळ पंच | ५१ |
| ६) | विकास मधुकरराव जाधव | तपासी अधिकारी | ५५ |
| ७) | डॉ.आर.एस. मोराळे | वैद्यकीय अधिकारी | ६१ |

## न्यायालयामार्फत तपासण्यात आलेले साक्षीदार

| अ.सा. | साक्षीदारांची नांवे | साक्षी प्रकार |
|---|---|---|
| - | - | - |

## अभियोग पक्षातर्फे देण्यात आलेल्या निशाणी

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| १ | ३८/सा.क्र. १ | फिर्याद |
| | ५६/सा.क्र. ६ | दवाखान्यातुन गुन्ह्याबाबत पोलीस स्टेशनला दिलेले पत्र |
| २ | ५७/सा.क्र. ६ | घटनास्थळ पंचनामा |
| | ५८/सा.क्र. ६ | वैद्यकीय प्रमाणपत्र मिळण्यासाठी दिलेले पत्र |
| ३ | ६२ व ६३/सा.क्र. ७ | वैद्यकीय प्रमाणपत्र |

**न्यायालयातर्फे देण्यात आलेले निशाणी**

| | | |
|---|---|---|
| १ | ६४ | फौ.प्र.सं. चे कलम ३१३ प्रमाणे आरोपींचे निवेदन |

**मुद्देमालाचा तपशील**

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | मुद्देमालाचा प्रकार |
|---|---|---|
| १. | एम.ओ. नं. १ व २<br>जी.एम.पी. नं.३३/२०२५ | दगड व लोखंडी फावडे |

## <u>न्यायनिर्णय</u>

## (दिनांक १२/०५/२०२६)

आरोपी क्र.१ ते ६ यांचे विरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ खालील शिक्षापात्र अपराधासाठी खटला चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाचे कथन खालीलप्रमाणे–**

**२.** फिर्यादी अ.सा.क्र.१ वंदना राजेंद्र मदने यांनी फिर्याद दिली की, दिनांक ०१/१२/२०२३ रोजी सकाळी ०५.०० वाजण्याचे सुमारास त्यांचे पती कोर्टातील कामासाठी छ.संभाजीनगर येथे निघाले होते. त्यावेळी चुलत सासरे

आरोपी क्र. ४ आप्पा मदने यांना देखील कोर्टाच्या तारखेसाठी जाणे होते. दुसरे वाहन नसल्यामुळे ते फिर्यादीचे पतीच्या गाडीमध्ये छ.संभाजीनगर येथे गेले. आमचा व आप्पा मदने यांचा मुलगा आरोपी क्र. १ बाळासाहेब यांचे वाद असल्याने माझ्या पतीने आरोपी क्र. ४ यांना आप्पा मदने यांना गाडीमध्ये घेऊन गेल्याचा आरोपी क्र. १ ला राग आला. त्यानंतर दि. ०३/१२/२०२३ रोजी सकाळी ७.०० वाजण्याच्या सुमारास घरी असतांना आरोपी क्र. १ व २ हे फिर्यादीच्या घरासमोर आले व माझ्या वडीलांना का घेऊन गेला होता असे म्हणुन विनाकारण त्यांना शिवीगाळ केली. त्यावर फिर्यादी व त्यांचे पती यांनी त्यांना समजावुन सांगण्याचा प्रयत्न केला व फिर्यादीचे पती म्हणाले की, बाळु तु शिव्या देऊ नको, आप्पांना विचार काय झाले ते. असे म्हणताच आरोपी क्र. १ ने फिर्यादीच्या पतीच्या डोक्यात व आरोपी क्र. २ ने फिर्यादीच्या डोक्यात दगडाने मारले व जखमी केले. त्यावेळी आरोपी क्र. ३ तुषार ने लोखंडी फावड्याच्या दांड्याने डोक्यात मारुन जखमी केले. तसेच आरोपी क्र. ४ ते ६ यांनी राजेंद्रला खाली पाडुन लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन शिवीगाळ केली व जीवे मारण्याची धमकी दिली. त्यावेळी वस्तीवरील काही लोकांनी भांडणाची सोडवासोडव केली. सबब प्रस्तुतची फिर्याद.

३. फिर्यादवरुन पोलीस ठाणे आष्टी येथे गु.र.क्र. ५२७/२०२३ नोंदविण्यात आला. प्रस्तुत गुन्हयाचा तपास, तपास अधिकारी व्ही.एम. जाधव, पोलिस ठाणे आष्टी यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळ पंचनामा करुन गुन्हयात वापरलेले हत्यार एक दगड व लोखंडी फावडे जप्त केला, साक्षीदारांचे तपासटिपण नोंदवले, जखमींचे वैदयकीय प्रमाणपत्रे व इतर कागदोपत्री पुरावा

हस्तगत केला. तपासाअंती आरोपींविरुध्द गुन्हा निष्पन्न झाल्याने न्यायालयात दोषारोपपत्र/अंतीम अहवाल दाखल केला.

**४.** पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपी यांचेवर भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये दोषारोप (निशाणी क्र.२३) निश्चित केला. आरोपींनी त्यांचे निवेदन (नि.क्र.२४ ते २९) अन्वये गुन्हा नाकबुल करुन संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शवली.

**५.** आरोपी यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ अन्वये निवेदन निशाणी क्र. ६४ वर नोंदविण्यात आले. त्यामध्ये आरोपींच्या शेतातुन पाट गेला आहे, त्याचे पैसे मिळावे म्हणुन फिर्यादीने खोटी केस केल्याचा बचाव घेतला आहे.

**६.** अभियोग पक्षातर्फे सहा.सरकारी अभियोक्ता व आरोपी तर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

**७.** या सर्व बाबींचा विचार करता खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात व त्यावरील निष्कर्ष त्याखाली नमुद कारणांकरीता नोंदविले आहेत :

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपी यांनी आपसात संगनमत करुन फिर्यादी व साक्षीदारास दगड व लोखंडी फावड्या यासारख्या प्राणघातक हत्याराने मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत केली? | नाही. |

| | | |
|---|---|---|
| २. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपी यांनी आपसात संगनमत करुन फिर्यादीस लाथाबुक्याने मारुन दुखापत केली ? | नाही. |
| ३. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपी यांनी आपसात संगनमत करुन फिर्यादीस जाणीवपुर्वक अपमानीत करुन शिवीगाळ केली व त्यांच्याकडुन सार्वजनिक शांततेचा भंग होईल हे माहित असुनही त्यास चिथावणी दिली ? | नाही. |
| ४. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपी यांनी आपसात संगनमत करुन फिर्यादीस जीवे मारण्याच्या धमकी देऊन फौजदारीपात्र धाकदपटशा केला ? | नाही. |
| ५. | आदेश काय ? | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येते. |

:: **का र ण मि मां सा** ::

**मुद्दे क्र.१ ते ४ करीता** :

८. मुद्दा क्र.१ ते ४ एकमेकांशी संलग्न असलेने त्यांची कारणे एकत्र नोंदविण्यात येत आहेत. अभियोग पक्षाने आरोपींच्या विरूद्ध गुन्हा सिद्ध करण्याकरीता वर भाग 'क' मध्ये नमुद केल्याप्रमाणे ७ साक्षीदारांना तपासले आहे. तसेच कागदोपत्री पुराव्याकामी 'अभियोग पक्षातर्फे देण्यात आलेल्या निशाणी' या उपरोक्त तपशिलात नमूद केलेली कागदपत्रे शाबित केलेली आहेत.

९. आरोपींच्या विरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने आरोपी यांनी आपसात संगनमत करुनी फिर्यादी व साक्षीदारास दगडाने व लोखंडी

फावड्याने मारुन दुखापत केली हे सिध्द करणे गरजेचे आहे. तसेच, त्यांनी फिर्यादी व साक्षीदारास लाथाबुक्क्याने मारहाण करुन शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली हे देखील अभियोग पक्षाने सिध्द करणे गरजेचे आहे.

**१०.** अ.सा.क्र.१ वंदना राजेंद्र मदने (फिर्यादी) यांनी त्यांच्या सरतपासात असे सांगितले आहे की, दि. ०१/१२/२०२३ रोजी पहाटे ५.०० वाजण्याच्या सुमारास त्यांच्या पतीला औरंगाबाद येथे तारखेकामी न्यायालयात जायचे होते. आरोपी क्र. ४ आप्पा यांना देखील तारखेकामी जायचे होते. एकच गाडी असल्याने ते त्यांच्या गाडीत गेले. आरोपी क्र. १ व आरोपी क्र. ४ ला सोबत नेल्यामुळे रागावले. दि. ०३/१२/२०२३ रोजी सकाळी ७.०० वाजण्याच्या सुमारास घरासमोर असतांना आरोपी क्र. १ व २ आले व त्यांच्या वडीलांना का घेऊन गेलात असे म्हणाले. त्यांच्या पतीने त्यांना तुझ्या वडीलांना विचार शिवीगाळ करु नको असे सांगितले व समजावले. आरोपी क्र. १ ने त्यांच्या पतीच्या डोक्यात दगडाने मारले. त्या भांडणे सोडविण्यासाठी गेले असता, आरोपी क्र. २ रुपालीने त्यांच्या डोक्यात दगडाने मारले. आरोपी क्र. ३ तुषार तेथे आला व लोखंडी खोऱ्याच्या दांड्याने त्यांच्या डोक्यात मारले. आरोपी क्र. ४ ते ६ धावत आले व त्यांच्या पतीला लाथाबुक्क्याने मारहाण केली व जीवे मारण्याची धमकी दिली. आवाजाने वस्तीवरील लोक जमा झाले व भांडणे सोडवली. त्यानंतर ते आष्टी सरकारी दवाखान्यात गेले. तेथे डॉक्टरांनी अ.नगर येथील सरकारी दवाखान्यात पाठवले. दि. ०५/१२/२०२३ रोजी दवाखान्यातुन डिस्चार्ज मिळाल्यानंतर नि. ३८ प्रमाणे फिर्याद दाखल केली. ६ तारखेला पोलीस घरी आले व त्यांना त्यांनी घटनास्थळ

दाखवले. पोलीसांनी घटनास्थळावरुन दगड व लोखंडी दांड्याचे फावडे जप्त केले. त्यांनी एम.ओ. १ व २ दगड व लोखंडी फावडे न्यायालयात ओळखले.

**११.** अ.सा.क्र.२ राजेंद्र पन्हालाल मदने (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार) यांनी त्यांच्या सरतपासात असे सांगितले आहे की, दि. ०१/१२/२०२३ रोजी औरंगाबाद येथे कोर्टात तारखेकामी भाड्याने प्रवासी घेऊन त्यांच्या गाडीने जात होते. आरोपी क्र. ४ आप्पा त्यांच्यासोबत तारखेकामी आले. सायंकाळी सर्वजण परत आले. दि. ०३/१२/२०२३ रोजी सकाळी ७.०० वाजण्याच्या सुमारास घरासमोर असतांना आरोपी क्र. १ व २ आले व माझ्या वडीलांना औरंगाबादला का घेऊन गेलात असे म्हणाले. ते त्यांना म्हणाले की, तु तुझ्या वडीलांना विचार. आरोपी क्र. १ ने शिवीगाळ सुरु केली. तेथे आरोपी क्र. २ रुपाली आली. आरोपी क्र. १ ने त्यांच्या डोक्यात दगडाने मारले. आरोपी क्र. २ रुपालीने त्यांच्या पत्नीच्या डोक्यात मागच्या बाजुने दगडाने मारले. आरोपी क्र. ३ तुषार तेथे आला व लोखंडी फावड्याने त्यांच्या पत्नीच्या कपाळावर मारले. तेथे वस्तीवरील लोक शांतीलाल मदने, विलास मदने जमा झाली त्यांनी भांडणे सोडवली. त्यानंतर ते व फिर्यादी आष्टी येथे सरकारी दवाखान्यात गेले. तेथे फिर्यादीने डोक्यात टाके घेतले व त्यांनी देखील उपचार घेतला. तेथील डॉक्टरांनी अ.नगर येथील सरकारी दवाखान्यात पाठवले. तेथे फिर्यादीने जाऊन सि.टी. स्कॅन केला व तीन दिवस भरती राहिली. दि. ०५/१२/२०२३ रोजी दवाखान्यातुन डिस्चार्ज मिळाल्यानंतर फिर्यादीने नि. ३८ प्रमाणे फिर्याद दिली. त्यांना आरोपींनी ज्या एम.ओ. १ व २ दगड व लोखंडी फावड्याने मारहाण केली तो त्यांनी न्यायालयात ओळखला.

**१२.** अ.सा.क्र.३ शांतीलाल सोनाजी मदने (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार) यांनी त्यांच्या सरतपासात असे सांगितले आहे की, फिर्यादी वंदना व त्यांच्या घरामध्ये ४०० फुट अंतर आहे. दि. ०३/१२/२०२३ रोजी सकाळी ६.०० ते ७.०० वाजण्याच्या दरम्यान आरोपी क्र. १ व २ हे अ.सा.क्र. १ व २ यांना शिवीगाळ करत होतो. ते त्यांच्या घरी होते. आवाज ऐकल्यानंतर ते भांडणे सोडविण्यासाठी गेले. आरोपी क्र. १ व २ यांनी फिर्यादी व तिचा पती राजेंद्र यास दगडाने फिर्यादीच्या घरापुढे मारहाण केली. भांडणामध्ये फिर्यादीच्या कपाळावर व तिचा पती राजेंद्र यांच्या डोक्याच्या मागच्या बाजुला जखमी केले. त्यांनी भांडणे सोडवल्यानंतर आरोपी क्र. ३ तुषार तेथे आला व लोखंडी फावड्याने फिर्यादीस डोक्यावर मारले. आरोपी क्र. ४ ते ६ यांनी फिर्यादीस व तिच्या पतीस लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर फिर्यादीचे पती फिर्यादीस आष्टी येथे सरकारी दवाखान्यात घेऊन गेले. त्यानंतर अ.नगर येथे सरकारी दवाखान्यात गेले. त्यानंतर नि. ३८ प्रमाणे फिर्यादीने कडा पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली. फिर्यादी व त्यांच्या पतीस ज्या दगडाने व लोखंडी फावड्याने मारहाण केली तो ओळखला. भांडणे सोडवण्यासाठी त्यांचा भाऊ विलास मदने हजर होता.

**१३.** अ.सा.क्र.४ विलास सोनाजी मदने (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार) यांनी त्यांच्या सरतपासात असे सांगितले आहे की, फिर्यादी त्यांची वहिणी आहे. फिर्यादीचे पती राजेंद्र व आरोपी क्र. १ बाळासाहेब हे चुलत भाऊ आहेत. दि. ०३/१२/२०२३ रोजी सकाळी ६.०० वाजण्याच्या सुमारास आरोपी क्र. १ बाळासाहेब अ.सा.क्र. २ ला जुन्या वादातुन शिवीगाळ करत होता. त्यावेळी फिर्यादी,

अ.सा.क्र. २ व आरोपी क्र. १ ते ६ हजर होते. सा.क्र. २ राजेंद्र आरोपी क्र. १ ला शिवीगाळ करु नका असे म्हणाला असता, आरोपी क्र. २ रुपालीला राग आला. त्यामुळे आरोपी क्र. १ ने सा.क्र. २ राजेंद्रला लोखंडी फावड्याने डोक्यात मारले. आरोपी क्र. ४ ते ६ यांनी सा.क्र. २ ला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. एम.ओ. १ व २ दगड व लोखंडी फावड्याने मारहाण केली तो त्यांनी न्यायालयात ओळखला.

**१४.** अ.सा.क्र.५ बबन धोंडीबा श्रीराम (घटनास्थळ पंच) यांनी त्यांच्या सरतपासात असे सांगितले आहे की, दि. ०६/१२/२०२३ रोजी जाधव पोलीसांनी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास शिराळ येथील हनुमंत गाव मदने वस्ती येथे पंचनाम्यासाठी बोलावले होते. घटनास्थळ फिर्यादीने दाखवले. फिर्यादीने मारहाण झालेले ठिकाण दाखवले. पोलीसांनी त्यांच्यासमक्ष पंचनामा करुन मुद्देमाल दगड व लोखंडी फावडे जप्त केला.

**१५.** अ.सा.क्र.६ विकास मधुकरराव जाधव (तपासी अधिकारी) यांनी त्यांच्या सरतपासात असे सांगितले आहे की, त्यांनी नि.५७ वरील घटनास्थळ पंचनामा केला. त्यानंतर घटनास्थळावरुन त्यांनी गुन्ह्यात वापरलेला दगड व लोखंडी फावडे जप्त केली. घटनेसंबंधी साक्षीदारांचे त्यांच्या सांगणेप्रमाणे जबाब नोंदवले. त्यानंतर आरोपींना फौ.प्र.सं. कलम ४१ अ व १७० ची नोटीस दिली. गुन्ह्यातील जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. आरोपींच्या विरुध्द गुन्हा निष्पन्न झाल्याने दोषारोप पत्र दाखल केले.

**१६.** अ.सा.क्र.७ डॉ. आर.एस. मोराळे (वैद्यकीय अधिकारी) यांनी त्यांच्या

सरतपासात असे सांगितले आहे की, दिनांक ०३/१२/२०२३ रोजी सकाळी ८.३० वाजण्याच्या दरम्यान फिर्यादी वंदना व राजेंद्र मदने त्यांच्याकडे आले होते. अ.सा.क्र.२ राजेंद्र व अ.सा.क्र. १ वंदना याच्या अंगावर नि.६२ व ६३ वरील वैद्यकीय प्रमाणपत्रामध्ये नमुद जखम आढळुन आली. सदरील जखम साध्या स्वरुपाची होती. सदरील जखम कठीण वस्तुने मारल्यास होवु शकते. त्याबाबत त्यांनी नि.६२ व ६३ वरील वैद्यकीय प्रमाणपत्र दिले.

**१७.** अभियोगपक्षाने युक्तीवाद केला की, अ.सा.क्र.१ ते ६ यांच्या पुराव्यावरुन आरोपींनी गुन्हा केल्याचे सिध्द होते. अ.सा.क्र.१ च्या पुराव्यात फिर्याद सिध्द झाली आहे. इतर साक्षीदारांचा पुरावा फिर्यादीस पुरक असुन त्यामुळे आरोपींविरुध्द गुन्हा शाबीत होतो. सबब आरोपींना दोषी ठरवुन शिक्षा करण्याची विनंती केली आहे. याउलट, आरोपीच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, अभियोग पक्षाच्या पुराव्यामध्ये अनेक विसंगती असुन आरोपींवरील गुन्हा संशयापलीकडे सिध्द केलेला नाही. अभियोग पक्षाने गुन्हा शाबीत करण्यासाठी स्वतंत्र साक्षीदारांची साक्ष नोंदविलेली नाही. सबब, आरोपींविरुध्द गुन्हा संशयापलीकडे सिध्द करण्यास अभियोगपक्षास यश आलेले नाही. त्यामुळे आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात यावी.

**१८.** अभिलेखाचे अवलोकन केले, दोन्ही पक्षाचा युक्तीवाद विचारात घेतला. आरोपींनी त्यांचे नि. ६४ वरील फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ प्रमाणे नोंदवलेल्या निवेदनामध्ये आरोपींच्या शेतातुन पाट गेला आहे, त्याचे

पैसे मिळावे तसेच जुन्या वादातुन खोटी केस केल्याचा बचाव घेतला आहे. सदर बचाव त्यांनी सिध्द केला किंवा कसे हे पाहणे आवश्यक आहे. तसेच आरोपीतर्फे युक्तीवाद केला की, आरोपींच्या शेतातुन गेलेल्या पाटाचा मोबदला फिर्यादी व त्यांच्या कुटुंबीयांना वाटते. तसेच आरोपींनी फिर्यादीवर त्यांच्या अगोदर केस केल्याच्या रागातुन फिर्यादीने सदरची केस केली आहे.

**१९.** आरोपींतर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासात अ.सा.क्र.१ यांनी मान्य केले आहे की, आरोपींनी गु.र.नं. ५२४/२०२३ त्यांच्यावर अगोदर केली. दि. ०३/१२/२०२३ रोजी आरोपी क्र. २ हिला फिर्यादीने मारहाण केल्यामुळे तिने तक्रार दिल्याचे त्यांनी मान्य केले. तिने पुढे मान्य केले की, पाटामध्ये गेलेल्या जमीनीचा मोबदला त्यांना मिळावा असे त्यांना वाटते. तिने पुढे मान्य केले की, आरोपींनी केलेल्या केसला शह देण्यासाठी सदरची केस दोन दिवस उशिराने केली. सदर बाब लक्षात घेता, फिर्यादीने पाटाच्या पैशासाठी तसेच आरोपींनी त्यांच्यावर केलेल्या केसला शह देण्यासाठी सदरची केस केल्याचे दिसुन येते. त्यामुळे फिर्यादीची साक्ष संशयास्पद वाटते.

**२०.** अ.सा.क्र.२ राजेंद्र सा.क्र. ३ शांतीलाल मदने यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये मान्य केले आहे की, आरोपी क्र. ४ ची जमीन पाटामध्ये संपादित झालेली आहे. त्यांना व त्यांच्या चुलत्यांना पाटाचे पैसे मिळावे असे त्यांना वाटते. तसेच आरोपी क्र. २ हिने तिला मारहाण केलेबाबत यापुर्वी केस केली आहे. त्यांनी देखील मान्य केले की, आरोपींनी केलेल्या केसला शह देण्यासाठी सदरची केस

केली. तसेच पुढे मान्य केले की, पोलीसांना दिलेल्या तक्रारबाबत संपुर्ण माहिती त्यांनी सांगितली. आरोपींनी त्यांच्यावर अदखलपात्र गुन्हा ५२६/२०२४ केला होता. सदर बाबी लक्षात घेता, पुर्ववैमानस्यातुन व पाटाचे पैसे मिळाण्यासाठी फिर्यादी व सा.क्र. २ यांनी आरोपीविरुध्द केस केल्याचे नाकारता येत नाही.

**२१.** सा.क्र. ३ शांतीलाल व सा.क्र. ४ विलास यांनी उलटतपासात मान्य केले की, फिर्यादीच्या केसला मदत व्हावी म्हणुन ते साक्षकामी आले आहेत. आरोपींनी केलेल्या केसमध्ये ते आरोपी आहेत. तसेच सा.क्र. ४ यांनी मान्य केले की, ऐकीव माहितीवरुन ते साक्ष देत आहेत. तसेच आरोपी क्र. २ हिने केलेल्या केसला शह देण्यासाठी फिर्यादी व सा.क्र. २ यांनी सदरची केस केली आहे. दोन्ही साक्षीदारांचा पुरावा वर नमुद कारणांसाठी संशयास्पद वाटतो. सा.क्र. ५ बबन यांनी उलटतपासात घटनेबाबत त्यांना प्रत्यक्ष माहिती नसुन पोलीसांनी लिहुन आणलेल्या कागदावर सही करण्यास सांगितल्याने सही केली असे सांगितले. त्यामुळे नि. ५७ वरील घटनास्थळ व जप्ती पंचनामा संशयापलिकडे सिध्द होत नाही. सा.क्र. ६ तपासी अधिकारी यांनी त्यांच्या उलटतपासात मान्य केले की, फिर्यादीचे नातेवाईक वगळता स्वतंत्र साक्षीदाराचे जबाब नोंदवले नाही. तसेच फिर्यादीने सुचवलेप्रमाणे साक्षीदारांचे जबाब नोंदवले. त्यामुळे तपास देखील योग्य झाला नसल्याचे दिसुन येते. केवळ सा.क्र. ७ वैद्यकीय अधिकारी यांच्या पुराव्यातुन आरोपीविरुध्द गुन्हा संशयापलिकडे सिध्द होत नाही.

**२२.** वर नमुद केल्याप्रमाणे, अभियोगपक्षाच्या पुराव्यावर संशय निर्माण

होईल असा बचाव आरोपीतर्फे मांडण्यात आला आहे. तसेच घटना दि. ०३/१२/२०२३ रोजी घडली असुन दोन दिवस उशिराने फिर्याद दाखल केल्याचे संयुक्तिक कारण अभिलेखावर आले नाही. त्यामुळे आरोपींनी फिर्यादीवर केलेल्या केसला शह देण्यासाठी फिर्यादीने त्यांच्यावर उशिराने केस केल्याचे दिसुन येते. वर नमुद केल्याप्रमाणे अभियोगपक्षाच्या पुराव्यावर संशय निर्माण होतो व सदर संशयाचा फायदा आरोपीस देणे पात्र ठरते.

**२३.** प्राप्त परिस्थितीत उपलब्ध पुराव्याचे एकंदर अवलोकन केले असता आरोपींविरुध्द गुन्हयामध्ये गोवण्याइतपत कुठलीही बाब न्यायालयासमोर आलेली नाही. अपु-या पुराव्यामुळे, आरोपींनी संगनमताने फिर्यादी व साक्षीदारांना दगड व लोखंडी फावड्याने मारुन दुखापत केली. तसेच, त्यांनी फिर्यादी व साक्षीदारांना शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली, हे संशयापलीकडे सिध्द होत नाही. अभियोगपक्षाला भा.दं.वि. कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ चे आवश्यक घटक सिध्द करण्यात पुर्णपणे अपयश आल्याचे दिसुन येते. सबब, मुद्दा क्रं.१ ते ४ चे निष्कर्ष “नकारार्थी” नोंदविले आहेत.

**<u>मुद्दा क्र.५ साठी</u>:-**

**२४.** मुद्दे क्र. १ ते ४ चा निष्कर्ष पाहता, अभियोगपक्ष आरोपी क्र.१ ते ६ यांचेविरुध्द आरोप शाबीत करण्यास अपयशी ठरले आहेत. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतात. आरोपी क्र. ३ ते ५ गैरहजर आहे. आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र असल्याने न्यायनिर्णय त्यांच्या गैरहजेरीत देण्यात येतो. सदर

प्रकरणातील जी.एम.पी. नं.३३/२०२५ मधील जप्त मुद्देमाल दगड मुल्यहीन असल्यामुळे अपील कालावधी संपल्यानंतर त्यांची नियमानुसार विल्हेवाट लावणे न्यायोचित होईल तसेच लोखंडी फावडे याची जाहीर लिलावाद्वारे विक्री करुन मिळालेली रक्कम शासन जमा करावी. करीता, मुद्दा क्र.५ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत केले आहेत :-

:: **आदेश** ::

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्र.१ ते ६ यांना फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) प्रमाणे भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या आरोपातुन निर्दोष मुक्त करण्यात येते. |
| २. | आरोपींचे बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येतात. |
| ३. | आरोपी यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७(अ) प्रमाणे प्रत्येकी रुपये १५,०००/- चे वैयक्तिक बंधपत्र व एक जामीनदार दयावा. |
| ४. | जी.एम.पी. नं.३३/२०२५ मधील जप्त मुद्देमाल दगड अपील कालावधी संपल्यानंतर त्यांची नियमानुसार विल्हेवाट लावावी. तसेच लोखंडी फावडे याची जाहीर लिलावाद्वारे विक्री करुन मिळालेली रक्कम शासन जमा करावी. |
| | (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर) |

MAHESH RAMCHANDRA BADAKH
Digitally signed by MAHESH RAMCHANDRA BADAKH
Date: 2026.05.12 17:51:33 +0530

( महेश आर. बडाख )
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.३), आष्टी

ठिकाण - आष्टी
दिनांक - १२/०५/२०२६

**CERTIFICATE**

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment / order"

Dictated on : 12/05/2026
Transcribed on : 12/05/2026
Checked & signed on : 12/05/2026

**Sd/-**
Rahul S. Abnave,
(Jr. Clerk)